Sonopaant Dandekar Shikshan Mandali's

# Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College, Palghar

(Best College – University of Mumbai)
(Amongst Top 100 Colleges in India by 'India Today-MDRA Survey 2020)

# प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

### प्रथम वर्ष–कला/वाणिज्य/विज्ञान/व्यवस्थापनशास्त्र/अकाऊंटींग अॅड फायनान्स/बॅंकिंग अॅड इंश्युरन्स/माहिती तंत्रज्ञान/संगणकशास्त्र/जैवतंत्रज्ञान

शैक्षणिक वर्ष 2022–2023 मध्ये सोनोपंत दांडेकर महाविद्यालयामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील पद्धतीचा अवलंब करून महाविद्यालयात प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

1. वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. 9 जून 2022 ते दि. 20 जून 2022 या कालावधीमध्ये मुंबई विद्यापीठाच्या mum.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर आपली पूर्व–प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे.

2. मुंबई विद्यापीठाच्या mum.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर आपली पूर्व–प्रवेश अर्ज भरीत असताना खालील कागदपत्रे जवळ ठेवावीत.

   1) स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो 2) आधारकार्ड 3) बारावी गुणपत्रिका 4) दहावीची गुणपत्रिका व प्रमाणपत्र 5) चालु स्थितीतील स्वतःचा ईमेल व मोबाईल नंबर.

3. मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करताना त्यांना देण्यात आलेल्या लॉगीन आयडी आणि पासवर्ड लक्षात ठेवावा अथवा त्याची नोंद करून ठेवावी.

4. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर ऑनलाईन पूर्व–प्रवेश अर्जावरील (Pre-Admission Online Enrolment form) अर्ज क्रमांक काळजीपूर्वक नोंद करून ठेवावा.

5. सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यापीठाच्या ऑनलाईन पूर्व–प्रवेश अर्जामध्ये सोनोपंत दांडेकर महाविद्यालय निवडायचे आहे.

   सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचा कोड **225** असा आहे.
   ज्या विद्यार्थीनींना सोनोपंत दांडेकर महिला वाणिज्य महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी **1058** असा कोड निवडायचा आहे.

6. महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यापीठाच्या पूर्व–प्रवेश अर्जासोबत सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचा ऑफलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा आहे. सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचा ऑफलाईन फॉर्म महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहे.

7. अर्ज भरत असताना विद्यार्थ्याने आपले नाव, पालकांचे नाव, जात प्रवर्ग, 12वी चे गुण यांची पूर्णपणे खरी माहिती देणे आवश्यक आहे. माहिती खोटी/लपविल्याचे आढळून आल्यास आपला प्रवेश नाकारण्यात येईल याची विद्यार्थी/पालक यांनी नोंद घ्यावी.

8. मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार विद्यापीठाचा ऑनलाईन पूर्व–प्रवेश अर्ज आणि महाविद्यालयाचा ऑफलाईन प्रवेश अर्ज दि. 20 जून 2022 रोजी दुपारी 01:00 वाजेपर्यंत प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे. (टीपः विद्यापीठाने जाहिर केल्यास त्यांच्या परिपत्रकानुसार सदर वेळेत बदल होऊ शकतो)

9. विद्यापीठाचा ऑनलाईन पूर्व–प्रवेश अर्ज आणि महाविद्यालयाचा ऑफलाईन प्रवेश अर्ज भरत असताना प्रथम वर्ष कला वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या प्रत्येक कॉलम्नमधून कोणताही एक–एक विषय निवडावयाचा आहे.

| कोणताही एक | कोणताही एक | कोणताही एक | कोणताही एक | कोणताही एक | कोणताही एक |
|---|---|---|---|---|---|
| Foundation Course-I | Communication Skill in English | Marathi (Compulsary) | Marathi-I | Philosophy-I | Geography-I |
| - | - | Hindi (Compulsary) | English-I | History-I | Economics-I |
| - | - | - | Hindi-I | Rural Development-I | Psychology-I |
| - | - | - | Political Science-I | - | - |

प्रथम वर्ष विज्ञान वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या दोन ग्रुपपैकी कोणताही एक ग्रुप निवडायचा आहे.

**01) Foundation Course-I / Chemistry / Physics / Mathematics**
**02) Foundation Course-I / Chemistry / Botany / Zoology**

उर्वरित शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने निर्गमित केलेले अनिवार्य विषय आहेत.

10. मुंबई विद्यापीठाने नेमुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार 20 जून 2022 रोजी दोन्ही अर्ज (विद्यापीठाचा ऑनलाईन पूर्व–प्रवेश अर्ज व महाविद्यालयाचा ऑफलाईन प्रवेश अर्ज) भरलेल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी मुंबई विद्यापीठाच्या पुढील परिपत्रकानुसार व सूचनांनुसार महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

11. महाविद्यालयाचा ऑफलाईन प्रवेश अर्ज व माहिती पुस्तिकेचे रू. 100 भरावयाचे आहेत. विद्यार्थ्याला छापिल माहिती पुस्तिका महाविद्यालयात उपलब्ध आहे.

12. जर आपल्याला महाविद्यालयाच्या विविध शाखांसाठी अर्ज करावयाचा असेल तर आपणांस प्रत्येक शाखेसाठी विद्यापीठाचा तसेच महाविद्यालयाचा ऑफलाईन वेगवेगळा प्रवेश अर्ज भरावा लागेल.

डॉ. किरण सावे
प्राचार्य

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College,
V.S. Apte Commerce College &
M.H. Mehta Science College
PALGHAR (W.R.)
Dist. Palghar, Pin-401404